ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 8 | APRIL - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# आत्मचरित्र लेखनाच्या प्रेरणा




डॉ. वसंत गायकवाड
सी.जे.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिरोडा.
जिल्हा– गोदिंया,(महाराष्ट्र)

**प्रस्तावना :-**

साधारणतः कुठलीही कलाकृती निर्हेतुक निर्माण होत नाही. कलाकृतीच्या निर्मितीमागे कुठलीतरी सुप्त किंवा स्पष्ट प्रेरणा असतेच. त्याशिवाय कलाकृती निर्माण होऊच शकत नाही. इतर वाङ्मयप्रकारांप्रमाणे आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकारही याला अपवाद राहू शकत नाही. त्यामुळे स्वाभाविकच आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराच्या निर्मितीमागेही अनेक प्रेरणा कार्यरत असताना दिसतात.

आत्मचरित्रे ही 'स्वान्त सुखाय' लिहिली जातात. मनुष्याला आपल्या जीवनयात्रेत जे बरेवाईट अनुभव येतात ते लोकांना सांगून टाकले की, त्याला हृदय हलके केल्यासारखे वाटते. ''स्निग्धजनसविभक्तं हि दुख सहयवेदनं भवति'' या कालिदासाच्या उक्तीप्रमाणे स्वतःच्या वेदना बोलक्या करण्यासही आत्मचरित्र लिहिले जाते.''[1] वेगवेगळ्या साधनांद्वारे माणूस स्वतःची कुतूहलपूर्ती करण्याचा प्रयत्न करीत असतो. मानवी जीवन व्यापारासंबंधी त्याच्या मनात नेहमी जसे असाधारण कुतूहल असते, तशाच प्रकारचे कुतूहल त्याला त्याच्या स्वतःच्या जीवनाविषयीही असते. या कुतूहलापोटीच स्वतःला आविष्कृत करण्याचे मार्ग तो शोधत असतो. इतर साधनांप्रमाणेच साहित्य हेही स्वतःला आविष्कृत करण्याचे एक माध्यम आहे. आत्मचरित्राच्या माध्यमातून तो स्वतःला आविष्कृत करीत असतो. यालाच आत्माविष्कार असे म्हणतात. आत्माविष्कारातून लेखक आनंदप्राप्ती करीत असतो. आत्मचरित्राच्या निर्मितीमागे आत्माविष्कार ही प्रेरणा कार्यरत असतेच. म्हणूनच वेळ जावी, करमणूक व्हावी, आपला पराक्रम ऐकवून दुसऱ्यास भारावून टाकावे', 'आपली हकिकत दुसऱ्याला ऐकवावी, गतगोष्टीत रममाण व्हावे या भूमिकेतून आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण', आनंद साधले यांचे 'मातीची चूल' यासारख्या आत्मचरित्रांची निर्मिती झालेली आहे.

मानवी जीवनासंबंधी हे एक सार्वत्रिक सत्य आहे की, मनुष्य बालपणात केवळ वर्तमानात जगतो. तारुण्यात तो भविष्यात जगतो, प्रौढावस्थेत तो वर्तमान आणि भविष्य यांच्या सीमारेषेवर जगत असतो. वार्धक्यात तो केवळ भूतकाळात जगत असतो. त्यामुळे या रसरसलेल्या भूतकाळाला इतरांच्या समोर मांडण्यात त्याला आनंद प्राप्त होत असतो. त्यामुळेच ''सामान्यपणे आयुष्याच्या उतरणीवर गतकालाचा आढावा घेण्याच्या भूमिकेतून आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत.''[2] अशा ''आत्मचरित्रांमागील प्रमुख प्रेरणा व्यक्तिगत इतिहासलेखनाची दिसते.''[3] अशा आत्मचरित्रात लेखक स्वतःच्या जीवनाचा विस्तृत वृत्तांत देत असतो. प्रामुख्याने त्याचा भर आपल्या सामाजिक, सांस्कृतिक कार्याचे इतिवृत्त सांगण्यावर असतो. तत्कालीन सामाजिक वास्तव, त्याच्या मर्यादा, प्रेरणा आणि प्रवृत्ती स्पष्ट करून यातून मी कसा मार्ग काढला याचा आलेख अशा आत्मचरित्रात साधारणत असतो. ''माझ्यासारख्या व्यक्तीने समाजासाठी जे काही केले, ते महत्त्वाचे आहे. ते सांगण्यासाठी हे आत्मचरित्र लेखन करण्याची प्रेरणा झाली.''[4] असे ही आत्मचरित्रे वाचताना सतत जाणवत राहते. साधारणतः अशा आत्मचरित्रात स्वाभाविकच आत्मगौरव होताना दिसतो. आत्मचरित्रकार अशा आत्मचरित्रांमधून आपल्या

समाजसेवक जीवनाचा आदर्श, आत्मचरित्राच्या रूपाने समाजासमोर ठेवत असतो आणि तरुण पिढीने त्याचे अनुकरण करावे अशी अपेक्षा ध्वनित केलेली असते असे स्पष्ट होते.

आत्मशोध घेणे ही माणसाची जन्मजात प्रवृत्ती आहे. स्वतःच्याच जीवनाचा तटस्थपणे शोध घेण्याच्या आणि कठोर आत्मपरीक्षण करण्याच्या भूमिकेतूनही आत्मचरित्राची निर्मिती होत असते. उदा. 'शिबाराणीच्या शोधात' या आत्मचरित्रात दिलीप चित्रे म्हणतात, ''माझा स्वभाव हेच माझं विधिलिखित. तोच मी शोधतोय. सगळ्या रूपाचं दळण दळत पिळूळ एकतानतेत आणि आतड्यांच्या घरघराटात.''[5] म्हणजे दि.पु.चित्रेंचं आत्मचरित्र आत्मशोधाच्या मार्गाने स्व–जीवनाचे चित्रण करीत असते. 'सांगते ऐका' हे हंसा वाडकरांचे आत्मचरित्रही याच मार्गाने जीवनाचा वेध घेताना दिसते.

निखळ बोधवादी भूमिकेतूनही आत्मचरित्रे निर्माण होत असतात. अशा आत्मचरित्रात आपल्यानंतरच्या पिढीने हा उपदेश आत्मसात करावा अशी अपेक्षा असते. वाचकांनी आपली भूमिका समजून घ्यावी किंवा आपल्या विषयीचे जनमानसात असलेले गैरसमज दूर व्हावे या दृष्टिकोनातून आत्मचरित्रे लिहिलेली असतात. 'नवरात्र संपले' या आत्मचरित्राच्या लेखनहेतूविषयी सांगताना श्रीधर कुलकर्णी म्हणतात, ''मला मुख्यतः सांगायचं आहे 1947 साली आणि नंतर ज्यांचा जन्म झाला आहे अशा तरुणांना. हेच भारताचं खरं बलस्थान आणि आशास्थानदेखील. ही पिढीच यापुढे देशाचं भविष्य घडविणारी. असलेल्या गदारोळातून अलिप्त राहून देशाचा स्वतंत्रपणे विचार करणारी. देशाचं भवितव्य घडविण्याची संधी दीर्घकाळ मिळणार आहे ती याच पिढीला. त्यांनाच स्वातंत्र्याच्या रजत महोत्सवाच्या निमित्तानं सांगणार आहे. 'अभिमानास्पद भूतकाळ असलेल्या या राष्ट्राला उज्ज्वल भविष्यकालाची जोड मिळवून द्या. दीड शतकाच्या त्याग बलिदानानंतर प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचं संरक्षण–संवर्धन करा.''[6] स्वातंत्र्य लढ्यात सामील होताना पाहिलेल्या स्वप्नांचा चुराडा झालेला लेखकाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरच्या काही वर्षांतच जाणवला. म्हणून नव्या स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण नव्या पिढीला व्हावे यासाठी लेखकाने आत्मचरित्राची निर्मिती केलेली आहे.

आपल्या 'तसबीर आणि तकदीर' या आत्मचरित्राचा लेखन हेतू स्पष्ट करताना श्री.के.क्षीरसागर म्हणतात, माझ्या या आत्मचरित्रात मी स्वतवरच भाष्य केलेलं आहे. यावरून बोध घ्यायचा तो एवढाच की, ''बोध घ्यायचा झालाच तर शरीरबळ, द्रव्यबळ व दैवबळ अत्यल्प लाभले असूनही केवळ विशिष्ट मूल्यांच्या प्रेमाच्या जोरावर मनुष्य माझ्याइतपत उद्योग करू शकतो, ज्ञानसाधना करू शकतो, हा बोध तरुण वयात साशंक असलेले काही वाचक माझ्या आत्मचरित्रावरून घेऊ शकतील.''[7] अशाप्रकारे इतरांना काहीतरी बोध व्हावा अशा निखळ बोधवादी भूमिकेतूनही आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराची निर्मिती होताना दिसते.

आत्मसमर्थन आणि प्रचार या हेतूंनीही आत्मचरित्रांची निर्मिती होत असते. आपल्या भूमिकेचं समर्थन अशा आत्मचरित्रांमधून आत्मचरित्रकार करीत असतो. समाजातील अनेक नामवंत किंवा यशस्वी व्यक्तींच्या आयुष्यात काही स्पष्ट विसंवाद निर्माण होतात. त्यामुळे सबंध जीवनात त्यांना जननिंदेला किंवा टीकेला तोंड द्यावे लागते. त्यांच्या जीवनातील आचरण आणि विचार, यातील तफावत त्यांच्या चाहत्यांच्या मनात नाना शंका निर्माण करीत असते. ''ब्रीद, निष्ठा, जाहीर भूमिका किंवा तत्त्वज्ञान आणि तद्‌विरोधी आचार किंवा मानवी मर्यादेमुळे अबुद्धीपूर्वक किंवा बुद्धीपूर्वक घडलेले प्रमाद याचा उलगडा करताना समर्थकांचीही त्रेधा उडते व तो एक कायमचा ठपका राहून जातो.''[8] यामुळे सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या व्यक्तीची सारी पुण्याई वाया जाण्याची भीती निर्माण होते. अशावेळी आत्मचरित्रकार घटनांच्या तपशिलासह वाचकांना अज्ञात राहिलेल्या बाजूचं स्पष्टीकरण देतो. यातून समर्थकांच्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे निरसन होते आणि सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या व्यक्तीची स्वच्छ प्रतिमा वाचकांसमोर येते. अपसमजाचे धुके नष्ट होते, संदिग्धता हरवते आणि आत्मचरित्रकाराची नवी प्रतिमा वाचकांच्या मनात पुनर्स्थापित होते. महर्षी कर्वे यांचे 'आत्मवृत्त' या भूमिकेतून निर्माण झालेले आत्मचरित्र आहे. मराठीमध्ये केळकर यांच्या 'गतगोष्टी'ला अशाच आत्मसमर्थनाचा वास येतो.

आत्मस्पष्टीकरण किंवा आत्मसमर्थन हा आत्मचरित्रनिर्मिती –मागील गौण हेतू मानण्यात येतो. कारण बऱ्याच वेळा आत्मस्पष्टीकरणाचे रूपांतरण आत्मसर्थनात व मतप्रतिपादनाचे रूपांतरण प्रचारात होण्याचा धोका निर्माण होतो. परंतु तरीही आत्मस्पष्टीकरण हा हेतू गौण समजणे चुकीचे होईल; कारण आपल्या भूमिकेचं स्पष्टीकरण इतरांपेक्षा आत्मचरित्रकारच योग्यप्रकारे देऊ शकतो असे सिद्ध होते. सार्वजनिक क्षेत्रात काम करणारे राजकीय नेते, साहित्यिक, व्यापारी, कलावंत, चित्रपट निर्माते आणि सामाजिक कार्य करणारे समाजसेवक इत्यादींच्या आत्मचरित्रात काही प्रमाणात ही प्रेरणा कार्यरत असताना दिसते.

उपकारकर्त्याचे स्मरण हाही आत्मचरित्रलेखनाचा हेतू असू शकतो. अशाप्रकारच्या प्रेरणेतूनही मराठीत आत्मचरित्रांची निर्मिती झालेली आहे. बाबा पदमनजी आपल्या 'अरुणोदय' आत्मचरित्राच्या लेखनहेतूविषयी म्हणतात, ''आता हे पुस्तक लिहिण्याचा हेतू सांगितला पाहिजे. तो हाच की, एका दीन पाप्यावर ईश्वराने जी परम दया केली तिचे वर्णन करावे आणि ते वाचून माझ्यासारख्या इतर पाप्यांनी त्या दयेचा अनुभव घ्यावा व ज्यांस असा अनुभव आला आहे त्यांनी तिचा महिमा गावा.''[9] यावरून उपकारकर्त्याचे स्मरण ही त्यांच्या आत्मचरित्रलेखनाची प्रेरणा आहे. या प्रेरणेचे अस्तित्व तुरळक प्रमाणात आढळते. याचे कारण आजच्या आपल्या सामाजिक जीवनात ईश्वर ही संकल्पनाच मत–मतांतरे आणि वाद–प्रतिवादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. कदाचित हे असावे असे वाटते.

साठोत्तरी साहित्यात प्रामुख्याने चर्चित ठरली ती दलित लेखकांची आत्मचरित्रे. या आत्मचरित्रात आपल्यावर झालेल्या आजवरच्या अन्यायाचे आणि उद्याच्या आकांक्षांचे वास्तवदर्शी चित्रण आहे. ही आत्मचरित्रे आयुष्याच्या साफल्याची कहाणी सांगण्याच्या हेतूने लिहिलेली नाहीत. केवळ व्यक्तीने आपल्या आयुष्यातील मान–अपमान, यश–अपयश, सुख–दुख, जिद्द–चिकाटी, परिस्थितीशी केलेला जीवघेणा संघर्ष अशा आशय–विषयांनी ओतप्रोत भरलेली ही आत्मचरित्रे आहेत. ''त्यामुळे साठोत्तरी कालखंडात दलित आणि विविध प्रकारे वंचित समाजातील व्यक्ती आपले सुखदुखाचे पाथेय स्पष्टपणे वाचकांसमोर खुले करू लागल्या आहेत. ही आत्मचरित्रे समाजाला अंतर्मुख करायला लावणारी आहेत.''[10] ऐन तारुण्यात ही आत्मचरित्रे लिहिलेली आहेत. 'मला हे सांगायचं आहे, हे लोकांना कळलं पाहिजे' अशी स्पष्ट भूमिका घेऊन ही आत्मचरित्रे लिहिलेली दिसतात. या आत्मकथनांच्या निर्मितीच्या हेतूंविषयी सांगताना आरती कुसरे म्हणतात, ''या लेखनामागे खरे दोनच हेतू सांगता येतात – '' (1) आपल्या अस्मितेचा शोध घेणे, आपल्या अस्तित्वाचा अर्थ समजून घेणे व समाजव्यवस्थेत आपले व आपल्या जातीचे स्थान निर्माण करणे आणि (2) त्याचबरोबर समाजव्यवस्थेत बदल किंवा परिवर्तन घडवून आणणे.''[11] या दोन हेतूंनी दलित आणि वंचितांच्या आत्मचरित्रांची निर्मिती झालेली आहे.

दलित आत्मचरित्रांच्या संदर्भात एवढे मात्र नोंदवावेसे वाटते की, या निर्मितिकारांना साहित्यलेखनाची परंपरा नव्हती. अक्षरांच्या जगात प्रवेश करणारे त्यांच्या कुटुंबातील ते पहिलेच होते. डॉ.आंबेडकरांच्या शिकवणुकीमुळे त्यांना आत्मभान आले. त्यातून समाज, संस्कृती, देश, वर्णव्यवस्था या संदर्भात त्यांच्या मनात नवे प्रश्न निर्माण झाले. एकूणच या सर्व व्यवस्थेमध्ये माझे स्थान काय? हा प्रश्न ते विचारू लागले. या प्रश्नाचे उत्तर 'काहीच नाही' हे येताच या लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून या व्यवस्थांवरच प्रश्नचिन्ह निर्माण केलेत. जे पाहिले, जे भोगले तेच लिहिले, जे सांगावेसे वाटले ते सांगितले. ज्या भाषेत सांगावेसे वाटले त्याच भाषेत सांगितले. आपल्या व्यक्तिगत जीवनाचा असा अस्सल प्रामाणिक आणि वाचकांना अंतर्मुख करणारा आविष्कार यापूर्वीच्या आत्मचरित्रांत आढळत नाही. या आत्मचरित्रांच्या प्रेरणांविषयी वासुदेव मुलाटे लिहितात, ''याशिवाय या सर्व आत्मकथनांच्यामधून एखाद दुसरा अपवाद वगळला तर या ना त्या स्वरूपात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे, त्यांच्या विचारांचे, कार्याचे कृतज्ञतापर्वूक उल्लेख येतात. किंबहुना त्यांच्या विचारांची प्रेरणाच या लेखनाच्या मागे असलेली दिसते.''[12] 'बलुतं', 'उपरा', 'काट्यावरची पोटं', 'आमचा बाप आन् आम्ही', 'माझ्या जल्माची चित्तरकथा', 'आठवणीचे पक्षी' अशा अनेक आत्मचरित्रांची लेखननिर्मिती या प्रेरणेतून झालेली दिसते.

आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांच्या संदर्भात सांगता येईल की, काही आत्मचरित्रांच्या मागे 'मी कुणीतरी आहे' हे स्पष्ट करण्याच्या भूमिकेतून आत्मचरित्रांची निर्मिती होताना दिसते. व्यक्तित्वाचा विकास जसा जीवनाच्या विकासासोबत होत असतो तसाच व्यक्तित्वाचा लोपही आयुष्याच्या उत्तरार्धात होताना दिसतो. जेव्हा व्यक्ती म्हातारी झालेली असते त्याचवेळी व्यक्तीला आपला 'मी'पणा हरवत चालल्याची जाणीव झालेली असते. नेमक्या अशाचवेळी लोक आपल्याला विसरत चालले आहे याचं दुख 'मी' ला तीव्रपणे जाणवते आणि मग हाच 'मी' आपल्या भूतकालीन जीवनाचा वृत्तांत मांडण्यात रमून जाताना दिसतो. या भूमिकेतून लेखन झालेल्या आत्मचरित्रांमध्ये ''...स्वतची खूण ठेवायची धडपड असते. सर्व 'अमुकपणा', 'मीपणा', नाहीसा होणार, अजिबात जाणार हे कळते आणि जन्मभर ज्याने सोबत केली तो 'मीपणा' टिकावा, ज्यांच्यामुळे हे व्यक्तिमत्त्व मिळाले त्यांच्या स्मृतीत काही दिवस घर करून राहावे, म्हणून धडपड चालते. कोणी बोलत राहतात, कोणी फोटो काढतात, कोणी आपली बडबड कागदावर उतरवितात. ''मी अमुक–अमुक आहे, हो, इथेच आहे, अगदी तुमच्यातच आहे, असा तो आक्रोश असतो.''[13] म्हणून इरावती कर्व्यांना आत्मचरित्रलेखन म्हणजे म्हातारपणाची केवळ बडबड वाटते.

आत्मचरित्रलेखनामागील वरील विविध हेतू आणि भूमिका स्पष्ट आहेत. तरीही 'माझ्याजवळ सांगण्यासारखे अनुभव आहेत. ते अनुभव मी इतरांना सांगितलेच पाहिजेत' या हेतूनेही आत्मचरित्रांची निर्मिती झालेली आहे. जीवन जगत असताना प्रत्येकालाच बऱ्या–वाईट अनुभवांना सामोरे जावे लागते. वैशिष्ट्यपूर्ण बरे–वाईट अनुभव इतरांना सांगावेसे वाटणे ही व्यक्तीची स्वाभाविक आणि सहज प्रवृत्ती आहे. किंबहुना ते सांगितल्याशिवाय मला चैन पडत नाही, या लेखकाच्या आंतरिक गरजेतूनही आत्मचरित्रांची निर्मिती होत असते. हिंदीतील सुप्रसिद्ध कवी हरिवंशराय बच्चन आपल्या 'क्या भूलूँ क्या याद करूँ' या आत्मचरित्रात आपली लेखनविषयक भूमिका मांडताना लिहितात – ''जीवन की जिस सिढी पर मै हूँ, उसपर अतीत का स्मरण शायद स्वाभाविक होता है। मेरे पास औरों का मन जानने के लिए भी केवल अपने मन का पैमाना है। मुझे कई वर्षो से लग रहा था की जब तक मै अपने अंतर मे निरंतर उठती स्मृतियों को चित्रित न कर डालूँगा तब तक मेरा मन शांत नही होगा।''[14] लेखकाची स्वतःला अभिव्यक्त करण्याची ही अस्वस्थ धडपडच आत्मचरित्राच्या निर्मितीमागील मूलभूत गरज असावी असे वाटते.

## संदर्भ टिपा


(1) भालेराव विमल ''आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे', साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्रथमावृत्ती, 1986 पृ.17

(2) शेवाळकर राम'निवडक मराठी आत्मकथा', साहित्य अकादमी, नवी दिल्ल्ी, प्रथम आवृत्ती, 1994पृ. 06

(3) यादव आनंद'आत्मचरित्रमीमांसा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, 1998पृ.06

(4) तत्रैवपृ.7

(5) चित्रे दि.पु.'शिबाराणीच्या शोधात', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 1971पृ. 63

(6) कुलकर्णी श्रीधर रंगनाथ'नवरात्र संपले', कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, 1994, प्रस्तावना पृ.72

(7) क्षीरसागर श्री.के.'तसबीर आणि तकदीर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, 1976 पृ.515

(8) शेवाळकर सं. राम (सं.)उ.नि.पृ. 05

(9) पदमजी बाबा'अरुणोदय', बॉम्बे ट्रॅक्ट ॲण्ड बुक सोसायटी, मुंबई, तिसरी आवृत्ती, 1955पृ. 09

(10) http.//www.uniquefeatures.in/smaranika, 13.12.2011 पृ.3

(11) कुसरे आरती'दलित स्वकथने साहित्यरूप', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, 1991पृ. 43

(12) मुलाटे वासुदेव'दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 1999पृ.72

(13) कर्वे इरावती'गंगाजल', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती, 1999पृ. 131

(14) बच्चन हरिवंशराय'क्या ूलूँ क्या याद करूँ', राजपाल एण्ड सन्स, कश्मीरी गेट, दिल्ली, बारावी आवृत्ती, 1993पृ. 5